माहीती अधिकार अधिनियम

2005



पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण

येथील माहिती अधिकार अधिनियम

कलम 4(1) (ख) अन्वये

सतरा मुद्यांची माहीती

सन . 2024

कलम ४(१) (ख)(एक) प्रमाणे

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण ची रचना

	पोलीस अधीक्षक	
अपर पोलीस अधीक्षक	पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय)	उपविभागीय पोलीस अधीकारी
	१. कार्यालय अधीक्षक २. प्रमुख लिपीक ३. व. श्रेणी लिपीक ४. क. श्रेणी लिपीक ५. कार्यालयीन शिपाई	१.उपविभागीय पोलीस अधीकारी, अचलपूर. २.उपविभागीय पोलीस अधीकारी, अंजनगांव. ३. उपविभागीय पोलीस अधीकारी, दर्यापूर. ४. उपविभागीय पोलीस अधीकारी, चांदुररेल्वे. ५. उपविभागीय पोलीस अधीकारी, मोर्शी ६. उपविभागीय पोलीस अधीकारी, धारणी. ७. उपविभागीय पोलीस अधीकारी, अमरावती ग्रा.

उपविभाग, अमरावती ग्रा.	पोलीस स्टेशन
१. उपविभागीय पोलीस अधीकारी, अचलपूर.	१.अचलपूर २. परतवाडा, ३.सरमसपूरा, ४.चांदुरबाजार, ५.शिरजगांव, ६. ब्राम्हणवाडा थडी
२. उपविभागीय पोलीस अधीकारी, अंजनगांव.	१.अंजनगांव २. पथ्रोट, ३.रहीमापूर.
३. उपविभागीय पोलीस अधीकारी, दर्यापूर.	१. दर्यापूर २. खल्लार, ३. येवदा.
४. उपविभागीय पोलीस अधीकारी,चांदुररेल्वे.	१.चांदुररेल्वे २. दत्तापूर, ३. मंगरूळ दस्तगीर ४. तळेगांव दशासर, ५. कु—हा, ६. तिवसा
५. उपविभागीय पोलीस अधीकारी, मोर्शी	१.मोर्शी २. वरड, ३.बेनोडा. ४. शिरखेड, ५.शे.घाट.
६. उपविभागीय पोलीस अधीकारी, धारणी.	१.धारणी २. चिखलदरा.
७. उपविभागीय पोलीस अधीकारी, अमरावती ग्रा.	१.लोणी, २. माहुली, ३. खोलापूर, ४. नांदगांव खंडे. ५. आसेगांव, ६.मंगरुळ चव्हाळा.

—: माहीती अधिकार अधिनियम—२००५ :—

कलम ४(१)(ख) नमुना ब(१)

पोलीस अधीक्षक कार्यालयाची कार्यपध्दती व कर्तव्ये

१	सार्वजनिक प्राधिकरणाचे नाव	पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण
२	संपुर्ण पत्ता	पोलीस अधीक्षक कार्यालय, अमरावती ग्रामीण, कॅम्प, अमरावती
३	कार्यालय प्रमुख	श्री. विशाल आनंद, (भा.पो.से), पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण
४	कोणत्या खात्याच्या अधिनस्त हे कार्यालय आहे ?	गृह खाते
५	कामाचा अहवाल कोणत्या कार्यालयाकडे सादर केला जातो ?	मा. पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य मुंबई.
६	कार्यकक्षा : भौगोलिक	या कार्यालयाचे अधिनस्त ७ उपविभागीय पोलीस अधीकारी कार्यालय व ३१ पोलीस स्टेशन आहेत.
७	संगीकृत व्रत (Mission)(*)	कायदा व सुव्यवस्थेच्या राखणे व गुन्हांस प्रतिबंध करणे
८	ध्येय / धोरण (Vision)(**)	नागरिकांचे जिवाचे व मालमत्तेचे रक्षण करणे
९	साध्य	लोकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे
१०	प्रत्यक्ष कार्य	कायदा व सुव्यवस्थेच्या राखणे
११	जनतेला देन असलेल्या सेवांचा थोडक्यात तपशील	कायदा व सुव्यवस्थेच्या बंदोबस्त करणे
१२	स्थावर मालमत्ता (येथे तुमच्या प्राधिकरणाची जमीन, इमारत आणि अन्य स्थावर मालमत्तेचा तपशील द्यावा)	सरकारी जमीनीवर कार्यालयाची इमारत आहे.
१३	प्राधिकरणाच्या संरचनेचा नकाशा (वंशवृक्षाचा नकाशा असा असतो तसा नकाशा काढुन प्रत्येक पातळीवर कार्यकक्षा व संपर्काच्या पध्दतीशी त्याची जोड घालून दाखवावी)	होय
१४	कार्यालयाची वेळ आणि दुरध्वनी क्रमांक (सर्व दुरध्वनी क्रमांक, फॅक्स क्रमांक, ई-मेल आणि कार्यालयीन कालानंतर संपर्काचा नातेदीचा क्रमांक असेल तर तोही क्रमांक द्यावा.)	सकाळी ०९.४५ ते १७.४५ वा. पर्यंत दुरध्वनी क्र.०७२१-२६६५०४१, फॅक्स क्र. ०७२१-२६६२१३० **sp.amravati.r @mahapolice.gov.in**
१५	साप्ताहिक सुट्टी आणि विशेष सेवांचा कालावधी	साप्ताहिक सुट्टी - रविवार , महिन्यातील दुसरा व चौथा शनिवार



कलम ४(१) दोन प्रमाणे

पोलीस अधीक्षक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी

यांचे अधिकार व कर्तव्ये

१. पोलीस अधीक्षक :— पोलीस अधीक्षक कार्यालयाचे प्रमुख

अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील पोलीस बलाचे निर्देशन व देखरेख पोलीस अधीक्षक करतात. सर्व मोठया समस्यांबाबत विशेषत: कर्मचारी वर्ग, त्याचे प्रशिक्षण व साधनसामग्री, पुरवठा व भांडार वस्तु, बलाच्या निर्वाह खर्चासाठी आवश्यक असलेली आर्थिक तरतुद आणि वेगवेगळया श्रेणीतील अधिका—यांचे अधिकार व कर्तव्ये यांच्याशी सबंधीत सर्वसाधारण धोरणांच्या समस्यांबाबत निर्णय घेणे किंवा त्याबाबत वि. पो. म. नी. अम परी. अमरावती, पोलीस महासंचालकांना व शासनास माहिती देणे, अशा सर्व बाबींसबंधात नियम व आदेशाची अंमलबजावणी करणे आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याची आणी गुन्हा प्रतिबंध व अन्वेषण यांच्याशी सबंधीत बाबीमधील कार्यक्षमते विषयीच्या गरजांनुसार वारंवार तपासणी करुन संपर्क साधणे हे पोलीस अधीक्षकांचे कर्तव्य असते.

२. अपर पोलीस अधीक्षक :—

अपर पोलीस अधीक्षक त्यांच्या हाताखालील उपविभागीय पोलीस अधिकारी यांना आवश्यक असेल तेव्हा मार्गदर्शन व सुचना देतात. त्यांच्या नियंत्रणाखालील विभागांवर सर्वसाधारण देखरेख ठेवण्यास ते जबाबदार असतात.त्यांनी सतत देखरेख ठेवुन त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाण्यांकडुन, त्यांच्या कार्यक्षेत्रातील गुन्हयांचा प्रतिबंध,अन्वेषण व तपास करण्याचे काम योग्य व कार्यक्षम रीतीने केले जात असल्याची खातरजमा करतात. त्यांनी शिस्त पालन आणी हाताखालील अधिकारी व कर्मचारी यांची गा—हाणी मिटवीतात. त्यांनी पोलीस ठाण्यांना काही कालांतरांनी अनपेक्षित भेटी देवुन अधिकारी व शिपाई दक्ष आहेत किंवा नाहीत ते पहातात. त्यांनी त्यांच्या क्षेत्रामधील गुन्हेगारी विषयक समस्यांचा अभ्यास करुन गुन्हयांचा सातत्याने परामर्श घेतात. त्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील वर्दी मिळालेल्या गंभीर अपराधाच्या ठिकाणी देखील भेटी देतात. माहिती अधिकारांतर्गत प्राप्त प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधीकारी म्हणून निर्णय घेतात.

३) पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय) :—

प्रशासकीय/कार्यालयीन कामकाजावर नियंत्रण व कोषागार व वित्तीय नियमानुसार नियंत्रण अधिकारी म्हणुन कार्यरत असणे. पोलीस मुख्यालय, मोटार परिवहन शाखा, नियंत्रण कक्ष व इतर कार्यालयीन शाखा ईत्यादी कामावर नियंत्रण ठेवतात तसेच प्राधीकरणाचे जनमाहिती अधिकारी म्हणून कामकाज पाहतात.

४) उपविभागीय पोलीस अधिकारी :—

उपविभागातील पो. स्टे. मध्ये दाखल गुन्हांवर नियंत्रण ठेवणे, पोलीस स्टेशनची नेरीक्षण करणे, भेटीयुक्त गुन्हांमध्ये भेट देवून तपासी अमलदार यांना मार्गदर्शन करणे. उपविभागातील राजकीय व गुन्हेगारांच्या हालचालीची माहीती संकलीत करवुन घेणे. विविध बंदोबस्त योजना कार्यान्वीत करणे तसेच उपविभागातील जनमाहिती अधिकारी म्हणून काम राहतात.

५) पोलीस निरिक्षक, स्थानिक गुन्हे शाखा :—

यांचे कडे विशेष कार्यकारी दंडाधिकारी या पदाचा कार्यभार असून प्रतिबंधक कार्यवाही खालील दाखल होणा—या गुन्हयाचे कामकाज व त्या व्यतिरिक्त नियंत्रणाखाली असलेल्या खालील पोलीस ठाण्याच्या सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवणे.

६) पोलीस निरिक्षक, जिल्हा विशेष शाखा :— अमरावती ग्रामीण जिल्हातील पासपोर्ट तसेच चारित्र्य पडताळणी करता आलेल्या अर्जाची पुर्तता करणे, सर्व प्रकारचे बंदोबस्तांचा आराखडा तयार करणे, आवश्यक त्याठिकाणी बंदोबस्त पुरविणे. तंटामुक्त समिती संबंधी माहिती अद्यावत ठेवणे.

७) पोलीस निरीक्षक नियंत्रण कक्ष :—

त्यांचेकडे नेमणुकीस असलेले सहायक पोलीस निरीक्षक आणि इतर पोलीस उपनिरिक्षक तसेच पोलीस कर्मचारी यांचे मदतीने अमरावती ग्रामीण जिल्हातील हददीतील घडामोडीवर लक्ष ठेवुन त्याबाबतची खबर वेळोवेळी वरिष्ठांना तसेच सर्व सबंधीताना कळविणे. वरिष्ठांचे आदेशानुसार बंदोबस्त/स्ट्रायकिंग फोर्स पुरविणे.वरीष्ठ स्तरावरील एमपीआयएस चे गुन्हे प्रणाली बाबतची माहिती अद्दयावत करणे.

८)पोलीस निरीक्षक कल्याण शाखा :— पोलीस कल्याण शाखेकडे पोलीस कल्याण निधीमधून पोलीस अधिकारी/कर्मचा—यांना विविध अनुदान वाटप, महाराष्ट पोलीस कुंटुंब आरोग्य योजनेचे कामकाज व तत्संबंधी कामे करण्यात येतात. त्याचप्रमाणे पोलीस कल्याण निधी वृध्दीगंत करण्यासाठी विविध सांस्कृतीक कार्यक्रमोचे आयोजन करून निधी जमा करण्यात येतो. तसेच पोलीस बॅड पथक विविध कार्यक्रमासाठी पुरविणे,त्यांचेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे,क्रिडा साहित्य खरेदी इत्यादी काम करण्यात येतात. अमरावती ग्रामीण अंतर्गत क्रिडास्पर्धा/विभागीय स्पर्धा विषयक कामकाज केले जातात.

९) अ) कार्यालय अधीक्षक :— आहरण व संवितरण अधिकारी, व लेखा विभाग पर्यवेक्षण

ब) प्रमुख लिपीक लेखा शाखा :— वेतन व भत्ते,अनुदान,देयकमंजुरी,अंदाजपत्रक तयार करणे,निवुत्ती वेतन, निमशासकीय रकमेचेरोखीचे व्यवहार,

क) प्रमुख लिपीक प्रबंधक शाखा :— आवक—जावक,बारनिशी,लेखन सामग्री, जडवस्तु सह: खरेदी

ड) प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा :— लिपीक वर्ग ३ व ४ चे आस्थापना बाबत माहिती

ई) आस्थापना शाखा :— पोलीस कर्मचा—यांची आस्थापना विषयक सर्व कामे या शाखा मार्फत चालतात (पोलीस भरती, पदोन्नती, इत्यादीबाबत कामकाज चालते.

फ) विभागीय चौकशी शाखा :— पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे कसुरी प्रकरणे हाताळणे विभागीय चौकशी संबधी सर्व कामे हाताळणे.

१० पोलीस निरिक्षक मोटार :—

पर्यवेक्षक व तांत्रिक मदतनीस यांचे तसेच वाहनपरिवहन विभाग आणि इंधन चालक यांचे मदतीने चालणारे कामकाज व नियंत्रण पुरवठा व वाहनांचे सुटे भाग पुरविणेवाहनाची दुरुस्ती व देखभाल ईत्यादी.

११) राखीव पोलीस निरिक्षक,पोलीस मुख्यालय :—

राखीव पोलीस उप निरीक्षक, कंपनी ऑर्डली, भांडारपाल, बॅंड मेजर, पोलीस रोखपाल, लाइन साजेंट,शस्त्र व दारु गोळा इन्चार्ज, कवायत निदेशक व इतर सहायक पोलीस कर्मचारी यांचे मदतीने पोलीस मुख्यालयातील सर्व कामकाज पहाणे.

१२ पोलीस ठाणे अधिकारी :— आपआपले पोलीस स्टेशन ला नेमणुकीस पोलीस निरीक्षक, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि आवश्यकतेनुसार नेमणुकीस असलेल्या पोलीस कर्मचा—याच्या मदतीने पोलीस ठाण्याचे कामकाज चालविणे. गुन्हे नियंत्रण, प्रतिबंध, कायदा व सुव्यवस्था राखणे.

१३ पोलीस निरीक्षक ग्रामीण वाहतुक शाखा :— सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक आणि आवश्यकतेनुसार नेमणुकीस असलेल्या पोलीस कर्मचा—याच्या मदतीने शाखेचे कामकाज चालविणे. वाहतुकीचे नियमन करणे.

पोलीस निरीक्षक यांचे कर्तव्य	१. पोलीस निरीक्षक त्यांच्या प्रभागातील क्षेत्रातील गुन्हयांच्या प्रतिबंध आणि तपास तसेच त्यांच्या वरिष्ठांचे आदेश अंमलात आणने आहे, त्यांच्या हाताखालील पोलीसामध्ये योग्य प्रकारे शिस्त राखली जात आहे, हे पाहण्यासाठी पोलीस निरीक्षक हे जबाबदार असतात. त्यांनी त्यांच्याकडे सोपविण्यात आलेल्या कामांची सांगोपांग माहिती करुन घ्यावी व त्यांच्या हाताखालील सर्व पोलीस कर्मचारी कर्तव्यावर हजर असून, कार्यदक्ष आहेत हे पहावे. सार्वजनिक शांततेस बाधक ठरणारा कोणताही गुन्हा किंवा प्रसंग घडण्याची शक्यता पोलीस निरीक्षकांना माहितीहोईल तेंव्हा त्या शक्यतेची माहिती त्यांना जी खबरदारीची उपाययोजन करणे त्यांना उचित वाटेल त्या उपाययोजनेसह त्यांच्या सर्व वरिष्ठ अधिका–यांना कळवतील. आवश्यक तेंव्हा–तेंव्हा ते शेजारच्या पोलीस ठाण्याच्या पोलीस प्राधिका–यांबरोबर थेट पत्रव्यवहार करतील आणि प्रभागातून निसटून जाणा–या अथवा निसटून जावून त्यांच्या प्रभागात येणा–या अपराध्यांना पकडण्यासाठी त्या प्राधिका–याबरोबर एक विचाराने कार्यवाही करतील आणि सर्वसाधारणपणे गुन्हयांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्यांचा तपास लावण्यासाठी उपाय योजतील. पोलीस निरीक्षक एखादया विशिष्ठ प्रकरणाचा तपास व्यक्तीश: हाती घेईल तेंव्हा फौजदार हे त्यांच्या आदेशानुसार कार्य करतील, परंतू इतर बाबतीत ते निरीक्षकांचे सर्वसाधारण निर्देशन व सल्ला यांना अधिनराहून स्वंतत्रपणे कार्य करतील. तथापि यामुळे ते त्यांच्या उपरोल्लीखीत जबाबदा–यामधून मुक्त होणार नाही आणि दंडाधिका–याकडून अनुज्ञेश मिळाल्याखेरिज पोलीसांना कार्यवाही करणे शक्य होणार नाही अशी प्रकरणे नसतील तर आदेशांसाठी न थांबता ते त्या सर्व प्रकरणामधील त्यांचेकार्य ताबडतोब सुरु करतील.
पोलीस हवालदाराची कर्तव्य	अ) हवालदार हे त्यांचे वरिष्ठ म्हणून नेमलेल्या फौजदारांच्या आणि पोलीस बलातील वरिष्ठ अधिका–यांच्या आदेशाच्या अधिन असतात. हवालदारांना नेमून देण्यात येईल त्या प्रभागाच्या मर्यादामध्ये त्यांना दुय्यम असणा–या सर्व पोलीसाकडून आज्ञा पालन करुन घेण्यास हे हक्कदार असतात. ब) हवालदारांनी त्याच्या प्रभागात घडणारे सर्व गुन्हे आणि दखलपात्र अपराध घडणार असल्यासंबंधिची कोणतही संभवनियता त्यांच्या फौजदारांना कळविणे आवश्यक असते, परंतू अपराध्याना शोधून त्यांना पकडण्यासाठी आवश्यक ती चौकशी सुरु करण्यासाठी त्यांनी आदेश मिळण्यासाठी त्यांनी थांबून राहता कामा नये. क) गुन्हयांस प्रतिबंध करताना व सुव्यवस्था राहतांना हवालदार त्यांचे वरिष्ठ अधिकारी त्यांना आदेश देतील अशा आदेशाचे पालन करतील. ड) अचानक किंवा संशयास्पद रीतीने झालेल्या मृत्यूच्या बाबतीत हवालदार, किंवा हवालदार हजर नसेल तर शिपाई त्याला फौजदाराकडून किंवा अन्य वरिष्ठ अधिका–याकडून आदेश मिळे पर्यत प्रेत जाळण्यास,पुरविण्यास किंवा (पारशांच्या प्रथेप्रमाणे) टाकून देण्यास प्रतिबंध करतील. इ) गावातील विशिष्ट नाक्यांचा किंवा गस्त क्षेत्रांचा प्रभार हवालदारांकडे

	असेल त्यावेळी ते पोलीस व्यवस्था विषयक सर्व बाबींमध्ये ग्राम पोलीस प्रमुखांबरोबर एक विचाराणे कृती करतील. फ) हाताखालील पोलीसांनी देखील कर्तव्यात केलेल्या हयगयीची आणि कोणत्याही आदेशाची अवज्ञा केल्याची किंवा त्यांच्या इतर गैरवर्तनाची सर्व प्रकरणी वरिष्ठ अधिका—यांच्या तात्काळ निदर्शनास आणुन देण्यास हवालदारांना जबाबदार मानण्यात येईल. ग) हवालदार हे फौजदारांचे सहाय्यक असतात आणि त्यांनी फौजदारांना शिपायांची कवायत घेण्याच्या, शिकवण्याच्या कामात व नाक्यावर वांरवांर गस्त घालण्याच्या कामात सहाय्य करावे. शिपांयानी केलेलीकोणतही हयगय ताबडतोब पोलीस निरीक्षकांना कळविण्यात यांवी तसेच त्यांच्या प्रशंसनीय कृतीही वरिष्ठयांच्या निदर्शनास आणून दयाव्यात.
पोलीस शिपायाची कर्तव्य.	१) गुन्हयास प्रतिबंध व त्याचा तपास करणे, कायदा आणि सुव्यस्था राखणे, फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार दंडधिका—यांचे वॉरंटस आवश्यक असल्यास त्या बाबतीत वॉरंटवर अपराध्यांना पकडणे,त्यांच्या ताब्यात देण्यात येतील असे कैदी,निधी किंवा खाजगी वा सरकारी मालमत्ता यांच्या सोबत संरक्षक म्हणून जाणे व त्यावर पहारा करणे आणि मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या नियम २२ अन्वये पोलीस अधिका—यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार हवालदार आणि वरिष्ठ अधिकारी आदेश देतील अशी पोलीस व्यवस्थेविषयक कामे शिपाई पार पाडतील. २) ज्या गुन्हयासाठी पोलीस वॉरंटवाचून अटक करू शकतात, असा कोणताही गुन्हा घडल्यावर शिपायने आदेशाची वाट न पाहता सहका—यांच्या मदतीने एक विचाराने ताबडतोब कृती करावी आणि वरिष्ठ पोलीस अधिका—यांच्या माहितीसाठी ताबडतोब आणि व्यवहार्य असेल तेथे लेखी अहवाल दयावा. ३) आग लागल्याच्या किंवा इतर कोणत्याही संकटाच्या प्रसंगी सहाय्य करणे व जनतेच्या सुरक्षरीतेसाठी आटोक्यात असेल ती प्रत्येक खबरदारी घ्यावी. हे देखील शिपायांचे कर्तव्य असेल. ४) नित्याचे गस्तीचे कर्तव्य शिपाई पार पाडणार नाही. गावामध्ये फेरफटका मारून काही माहिती मिळते काय हे पाहण्यासाठी शिपायाचा वापर करावयाचा असेल,तेव्हा त्याला नेमक्या सुचना देण्यात आल्या पाहिजे.
मोटर परिवहन अधिकारी यांचे कर्तव्य	१) मोटार परिवहन अधिकारी हे त्यांची जेथे नियुक्ती आहे तेथील विभागाचे थेट प्रभारी अधिकारी राहतील. २) ते प्रशासकीय बाबतीत पोलीस आयुक्त यांच्या नियंत्रणाखाली असतील आणि तांत्रिक बाबतीत पोलीस उप महानिरीक्षक,मोटार परिवहन विभाग,पुणे यांच्या नियंत्रणाखाली असतील. ३) त्यांच्या प्रभारातील सर्व वाहनांच्या अधुन मधून पुर्ण तपासणी करीता आणि शक्यतोवर नेहमीच वाहन सुस्थितीत ठेवण्यास जबाबदार असतील. ४) त्यांच्या प्रभारामधील खालील सर्व शाखांवर ते नियंत्रण ठेवून देखरेख करतील. अ) वाहन दुरूस्ती आणि परिक्षण

	क) भांडाराचा व्यवहार (पेट्रोल,ऑईल आणि वंगण व सुटे भाग इत्यादी) ड) मोटार परिवहनचे विविध अभिलेख ठेवणे. ई) प्रशासकीय अभिलेख ठेंवणे. ०५) त्यांच्या प्रभारातील मोटार परिवहन विभागाची तपासणी वरिष्ठांनी करण्यासाठी जरूर ती व्यवस्था ते करतील आणि सर्व भाडांर,खतावणी (लेजर)आणि इतर मोटार परिवहन अभिलेख अद्ययावत ठेवतील,तसेच जरूर ती कारवाई करतील,सुचना आणि तपासणी टिपणीची पुर्तता करतील. ०६) त्यांच्या कनिष्ठ कर्मचा—यांना योग्य प्रकारे कर्तव्य वाटप केले जाते याबाबत ते खात्री करतील आणि त्यांची कार्यक्षमता व शिस्त राखतील. ०७) अनियमीतता,बेशिस्त वाहनांचा गैरवापर अपघात इ.बाबतची प्रकरणे ते न चुकता आपल्या वरिष्ठ अधिकारी यांच्रू निदर्शनास आणून देतील. पोलीस निरीक्षक,मोटार परिवहन विभाग यांच्या अधिपत्याखाली खालील कर्मचारी काम करतात. ०१) मोटार परिवहन पर्यवेक्षक ०२) पोलीस हवालदार चालक यांत्रिक अथवा वाहन जोडारी चालक शिपाई
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यांचे कर्तव्य	राखीव पालीस निरीक्षक हे पोलीस मुख्यालयाच्या सर्व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम करित असतात. आयुक्तालयातील पोली अधिकारी/कर्मचारी यांची वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे घेण्यात येणा—या कवायत,सेरेमोनियल परेड यांचे आयोजन करणे,उजळणी कोर्स, क्रिडास्पर्धाचे आयोजन करणे,पालीस मुख्यालयातील स्वच्छता,शिस्त राखण्याचे काम लाईन सार्जंट यांचे मार्फतीने करून घेणे वरिष्ठांच्या आदेशाप्रमाणे पोलीस मुख्यालयाकडे उपलब्ध असलेल्या मनुष्य बळातुन बंदोबंस्त,गार्ड,कैदीपार्टी करीता कर्मचारी पुरविणे रा.पो.नि.यांचे अखत्यारित शस्त्रसाठा,दारूगोळा,भांडारगृह,आयुधिक कार्यशाळा पालीस मेस,रोखपाल इत्यादी विभाग येतात.

कार्यालयीन शाखा व त्यांची कामे

१) लेखाशाखा

अ.नं.	हुद्दा	कार्यविवरण
०१	प्रमुख लिपिक	१) लेखा शाखेतील सर्व कार्यसनावर देखरेख ठेवणे,वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे, आठमाही सुधारीत अंदाजपत्रक तयार करणे,पोलीस महासंचालक माहलेखाकार यांनी घेतलेल्या वार्षीक तपासणी अहवालाची पूर्तता करणे. पोलीस संरक्षण पथकाच्या वसुलीबाबत पत्रव्यवहार करणे, पालीस संरक्षण पथकाच्या वसुलीबाबत पत्रव्यवहार करणे,पोलीस आयुक्त यांचे समवेत पोलीस ठाणे/शाखा यांची वार्षिक तपासणी करून अहवाल सादर करणे पोलीस मुख्यालय येथील रोखपाल यांचे लेख्याचे दरमहा निरीक्षण तसेच क.श्रे.लि.यांची दप्तर तपासणी करणे. २) पोलीस रोखापाल यांनी सर्व नगदी पुस्तके अद्यावत ठेवणे,रोखपाल भत्ता मंजूर करणे,पोलीस कल्याण निधी तिमाही अहवाल सादर करणे, आकस्मिक खर्चाची देयके अदा करणे,पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे वेतन व इतर भत्ते यांची देयके अदा करणेबाबत कार्यवही,रोकड रक्कम तसेच बॅकेतील चालू खात्यावरील सर्व रकमेबाबत पत्रव्यवहार करणे. ३) लेखा शाखेतील नेमूण दिलेल्या वरिष्ठ/कनिष्ठ लिपीकांकडून खालील कामे करून घेणे. अ) सेवानिवृत्त/मयत अधिकारी कर्मचारी यांचे सेवानिवृत्तीचे,कुटुंब निवृत्ती वेतन प्रस्ताव सादर करणे,सदर वेतने व अंतिम प्रदाने अदा करणेबाबत कार्यवाही करणे. ब) पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे भ.नि.नि. चे परतावा, नापरतावा अग्रीमाबाबत कार्यवाही,मिसींग केडीट प्रकरणांची कामे,मासिक वेतन व भत्ते, वैद्दकिय बिले अदा करणे याबाबतची सर्व कार्यवाही. क) पालीस कर्मचा—याची प्रवासभत्ता देयके व अग्रिमाबाब कार्यवाही करणे. तसेच साप्ताहीक सुटटी देयके,अहारभत्ता देयके,एस.टी.वॉरट आकस्मिक खर्च संक्षिप्त देयके,बक्षिस देयके, याबाबत कार्यवाही करणे. ड) मासिक खर्च विवरणवत्र सादर करणे,बक्षिस देयके अनुदानाबाबत ताळमेळ पोलीस पाटील मानधन पत्रव्यवहार इत्यादी कामे करणे.

(२) आस्थापना शाखा

अ. न.	हुद्दा	कार्यविवरण
०२	प्रमुख लिपीक	१) पोलीस महासंचालक,मुबंई यांचे वार्षिक निरिक्षण तसेच कार्यालयाकडून पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांनी घेतलेल्या वार्षिक तपासणीतील आक्षेपांची पूर्तता करणे. पोलीस भरती, पोलीस कर्मचा–यांच्या बदल्या, पदोन्नत्या, वार्षिक शिट रिमार्कस आस्थापना शाखेतील सर्व लिपीकांच्या कामात देखरेख करणे. २) आस्थापना शाखेतीलल सहाययक लिपिकांकडून खालील कामकाज करून घेणे. नियमित वेतनवाढ,वेतन निश्चिती,हस्तनोंदवही अद्ययावत ठवणे,सेवा जेष्ठता यादया प्रसिध्द करणे,कॅज्युलिटी रजि.ठेवणे पोलीस ठाणे/शाखा यांचेकडून नोकरी पत्रके मागवू मंजूर/हजर/रिक्त संख्याबळाचा आढावा घेवून तक्ता अद्ययावत ठेवणे.पोलीस कर्मचा–यांच्या सेवा पटातील वेतनवाढ,बक्षिसे,शिक्षा सर्व प्रकारच्या रजा,ओळखपत्र,रजा अभिलेख,नोंदी,अज्ञांकित कक्ष,दररोज पोलीस नोटीस प्रसिध्द कर्मचा–यांचे प्रशिक्षण इत्यादी कामे कामे करून घेणे.

(३) पत्रव्यवहार शाखा

अ. क.	हुद्दा	कार्यविवरण
०३	प्रमुख लिपीक	१) पोलीस अधिकारी वर्ग–१ ते ३ यांच्या आस्थापनेबाबतची सर्व कामे या पोलीस आयुक्त ते पोलीस उप निरीक्षक पदाचे अधिका–यांचा समावेश होतो. २) लिपीक आस्थापनेचे काम हाताखालील क.श्रे.लि.यांचेकडून करुन घेणे. यात कार्यालय अधिक्षक, लघुलेखक, प्रमुख लिपीक,वरिष्ठ श्रेणी लिपीक वर्ग– ४ चे कार्यालयीन शिपाई व सफाई कामगार, अंशकालीन सफाई कामगार व पोलीस हॉस्पीटलकडील वर्ग–४ चे कर्मचारी यांचा समावेश होतो. ३) पुनर्रनेचे प्रस्ताव पाठविणे, वार्षिक प्रशासकीय अहवाल पाठविणे, पदनिर्मीतीचे प्रस्ताव अस्थायी पदांना मुदतवाढ इत्यादी बाबतचे पत्रव्यवहार करणे. ४) पोलीस कल्याण मा.प.वि. क्लोदींग याविषयांचे सर्व कामकाजावर देखरेख ठेवणे.

०४	प्रबंधक व.श्रे.लि	भांडारगृहा संबधीचे सर्व कामकाज सर्व प्रकारची स्टेशनरी/फर्निचर, संगणक,झेरॉक्स मशिन व तत्संबधी सामुग्री सर्व पोलीस ठाणे/शाखा यांना पुरविणे, कार्यालयास येणारे सर्व प्रकारचे टपाल स्वीकारणे, आवक जावक नोंद वही ठेवून हाताखालील लिपीकामार्फत संबधीतांना देणे, पोष्टाने पाठविणे,सर्व प्रकारचे शासन निर्णय व परिपत्रके यांची सूची अद्यावत ठेवणे.
०५	प्रमुख लिपीक विभागीय चौकशी लिपीक	१) विभागीय चौकशी लिपीक यांचेकडील प्राथमिक चौकशी अहवाल, विभागीय चौकशी सुरु करणेबाबत कार्यवाही/निलंबन/वेतन पुन:स्थापन इत्यादींचे कामकाजावर देखरेख ठेवणे.
०६	व.श्रे.लि. अर्ज चौकशी	१) अर्जशाखेतील स्थानिक/शासन/पोमसं/अर्जावर कार्यवाही करणे, अहवाल नस्तीबंद करणे पोलीस महासंचालक/शासनाला अहवाल पाठविणे. २) माहीती अधिकार—२००५ अंतर्गत प्राप्त प्रशासनिक शाखेचे अर्जावर/अपिल अर्जावर कार्यवाही करणे. संबधीत विभागाचे अर्ज संबधीत विभागास पाठविणे. पोलीस महासंचालक व शासनाकडून प्राप्त झालेले माहीती अधिकाराचे अर्ज अपिल अर्ज यावर संगधीत पोलीस ठाणे/शाखा कार्यालये यांचेकडून प्राप्त करुन घेवून ती एकत्रितरित्या शासनास/पोलीस महासंचालक यांना सादर करणे.
०७	प्रमुख लिपीक आस्थापना	आस्थापना शाखेतील पुर्ण कामकाज, सपोउपनि ते पोशि हस्तनोंदवही, सपोउपनि ते पोशि जेष्ठता सुची, पदोन्नतीचे संबंधीची निवडसूची, पोलीस भरती, रोष्टर, अगावू वेतनवाढ, राष्टपती पदक तैनाती रजिष्टर, न्यायालयीन प्रंकरणे, मानिव तारीख आंतरजिल्हा बदली, प्रशिक्षणे, तसेच पोलीस कर्मचारी यांचे सेवाविषयक संपूर्ण कामकाज कनिष्ठ श्रेणी लिपीक व वरिष्ठ श्रेणी लिपीक यांचेकडून कामे करुन घेवून संपूर्ण कामकाजावर देखरेख करणे.

कलम ४(१) तिन प्रमाणे

निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अनुसरणात येणारी कार्यपध्दती तसेच पर्यवेक्षण आणि उत्तरदायीत्व प्रणाली

अमरावती ग्रामीण दलातील पोलीस मुख्यालय येथे शस्त्रागार व दारु गोळा साठा, मोटार परिवहन विभाग, आयुधिक कर्मशाळा, वस्त्र भांडार/साधन व सामुग्रीचे गोदाम, कवायत मैदान, पोलीस रुग्णालय, पोलीस कल्याण, नियंत्रण कक्ष, विशेष शाखा, गुन्हे शाखा, महिला तक्रार निवारण केंद्र, बिनतारी संदेश विभाग, अंगुली मुद्रा विभाग, विदेशी नागरिक आणि पारपत्र शाखा इत्यादी विभाग आहेत.

पोलीस मुख्यालय आणि पोलीस वसाहतीत स्वच्छता, साफ सफाई कायमस्वरुपी कर्तव्यावर असलेले वर्ग –४ कर्मचारी आणि आवश्यकतेनुसार रोजंदारीवर घेण्यात आलेले सफाई कामगार यांच्या कडून करुन घेण्यात येते.

आयुधिक कर्मशाळेत विविध प्रकारच्या शस्त्रांची देखभाल करण्यांत येते.

मोटार परिवहन विभागात शासकीय पोलीस वाहनांची दुरुस्ती, देखभाल, करण्यांत येउन वाहन चालकांवर नियंत्रण ठेवले जाते.

कवायत मैदानावर राष्ट्रीय कार्यक्रमानूसार पोलीस परेडचे आयोजन करण्यात येत असते. याव्यतिरिक्त अमरावती ग्रामीण पोलीस दलातील पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांची आठवडयाच्या प्रत्येक मंगळवार पिटी परेड आणि प्रत्येक शुक्रवारी सेरेमोनीयल परेड घेण्यात येते. त्याचप्रमाणे उजळणी कोर्सकामी पोलीस मुख्यालयात असलेल्या पोलीस कर्मचा–यांसाठी कवायत मैदानाचा उपयोग होतो. वेळप्रसंगी पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यातील वार्षीक क्रिडा स्पर्धेचे आयोजनही सदर मैदानावर करण्यात येते.

पोलीस कल्याण विभागा तर्फे अधिकारी/कर्मचारी यांच्या पाल्यांसाठी पाळणा घर, बालवाडी, प्राथमिक शाळा चालविण्यात येते. त्याचप्रमाणे सार्वजनिक वाचनालय, अत्याधुनिक हेल्थ क्लब, जलतरण तलाव, पोलीस क्लब आहे.

पोलीस नियंत्रण कक्ष पोलीस अधिक्षक कार्यालयाचे आवारात असून त्याठिकाणी तातडीच्या बंदोबस्तासाठी स्ट्रायकींग फोर्स २४ तास उपलब्ध असतो. त्याचप्रमाणे नियंत्रण कक्ष येथे दुरध्वनी यंत्रणा, फॅक्स संदेश यंत्रणा, बिनतारी संदेश यंत्रणा, व्हाईस लॉगर यंत्रणा कार्यान्वीत असून नियत्रण कक्षामार्फत महाराष्ट्रातील संपूर्ण पोलीस विभागा अंतर्गत स्वरमार्ग वाहीनीव्दारे व बिनतारी संदेशाव्दारे त्वरीत संपर्क साधता येतो.

कलम ४ (१) चार प्रमाणे

अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील कार्य पार पाडण्यासाठी

ठरविण्यात आलेली मानके

अमरावती ग्रामीण जिल्हा पोलीस दलातील ३१ पोलीस ठाणे तसेच शाखेची वार्षिक तपासणी पोलीस अधीक्षक तसेच अपर पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्फत केली जाते. उपविभागीय पोलीस अधिकारी हे पोलीस स्टेशनच्या वार्षिक निरीक्षणाची तपासणी अहवालाच्या प्रती पोलीस अधीक्षक यांचे कडे पाठविल्या जातात.

पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी हे त्यांचे अधिपत्याखाली पोलीस ठाण्यास वेळोवेळी नियमित भेट देवून त्यांच्या कामकाजाची पाहणी गंभीर गुन्हयाच्या घटनास्थळी वेळोवेळी भेट देवून संबंधितांना मार्गदर्शन करतात.

कलम ४ (१) पाच प्रमाणे

पोलीस अधीक्षक कार्यालयातील कार्य पार पाडण्यासाठी अधिकारी व कर्मचारी वर्गाकडे वापरण्यात येणारे नियम, विनिमय, सुचना, नियम पुस्तिका आणि अभिलेख.

पोलीस अधीक्षक व त्यांच्या अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी हे गृहविभाग महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र नागरी सेवा नियमावली मध्ये नमुद केल्याप्रमाणे कार्य करतात त्यांनी कव्वविलेले आदेश, परिपत्रकाची अंमलबजावणी केली जाते. दैनंदिन कामकाजासाठी पोलीस भारतीय दंड संहिता, भारतीय पुरावा कायदा, पोलीस म्यॅनुअल,मुबई पोलीस कायदा तसेच वेळोंवेळी निर्गमित करण्यात आलेले राज्य व केंद्र शासनाचे फौजदारी कायदयाचे अंमलबजावणीचे काम करतात. केंद्र शासन व राज्य शासन कायद्याचे अवलोकनासाठी कार्यालय अधीक्षक यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

महाराष्ट्र पोलीस नियमावली भाग–१, २, ३, कोषागार नियम, महाराष्ट्र आकस्मिक खर्च व प्राधिकार अंदाज पत्रक संहिता, महाराष्ट्र नागरी सेवा अन्वये खालील प्रमाणे रजिष्टर ठेवण्यात येतात.

१) शासकीय अध्यादेश रजिष्ट्र
२) जडसंग्रह नोंदवही
३) धनादेश रजिष्टर
४) सेवापट रजिष्टर
५) मंत्रालयीन कर्मचारी सेवापट रजिष्टर
६) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची सेवानिवृत्त प्रकरणे नोंद रजिष्टर
७) विभागीय चौकशी रजिष्टर
८) पोलीस कर्मचारी सनद रजिष्टर
९) स्टेशनरी खरेदी वाटप रजिष्टर
१०) पोलीस अधिकारी व कर्मचारी निवासस्थान वाटप रजिष्टर
११) पोलीस कर्मचारी यांचे सेवाजेष्ठता यादी
१२) निलंबित पोलीस अधिकारी व कर्मचा–यांची नोंदवही
१३) पोलीस अधिकारी व कर्मचारी, मंत्रालयीन अधिकारी, कर्मचारी यांचे वेतनवाढ रजिष्टर
१४) पोलीस अधिकारी व कर्मचारी, मंत्रालयीन अधिकारी, कर्मचारी मंजूर संख्याबळ नोंदवही
१५) पोलीस कर्मचारी रिक्तपद नोंदवही
१६) पोष्टवार रजिष्टर
१७) हॅण्ड रजिष्टर

१८) अंशकालीन कर्मचारी (वर्ग ४) नोंदवही

१९) लोकसभा विधानसभा तारांकित प्रश्न नोंदवही

२०) पोष्ट तिकीट जमाखर्च नोंदवही

२१) जनरल कॅशबुक

२२) जमा व्हाउचर खर्च व्हाउचर नोंदवही

२३) बिल रजिष्टर

२४) परवाना फी रजिष्टर

२५) स्थायी अग्री नोंदवही

२६) बक्षीस नोंदवही

२७) प्रवासभत्ता अग्रीम नोंदवही

२७) आकस्मिक खर्च नोंदवही

२८) अहार भत्ता, साप्ताहिक सुटी मोबदला,प्रवासभत्ता मंजूरी नोंदवही

२९) विज, पाणि, घरपटटी, दुरध्वनी मंजूर देयके नोंदवही

३०) परवाना रजिष्टर

३२) सिनेमा परवाना रजिष्टर

३३) स्फोटक परवाना रजिष्टर

३४) शस्त्र परवाना रजिष्टर

३५) समन्स रजिष्टर

३६) वांरट रजिष्टर

कलम ४ (१) सहा प्रमाणे

पोलीस अधीक्षक कार्यालयातील असलेले दस्तऐवजांचे विवरण

१) स्थायी आदेश फाईल
२) आवक रजिष्टर
३) जावक रजिष्टर
४) क्राईम रजिष्टर
५) रिपत्रक फाईल
६) तडीपार रजिष्टर
७) पोलीस नोटीस फाईल
८) रेल्वे वॉरंट बुक
९) मोटर वॉरंट बुक
१०) जी.एन.पावती बुक
११) हजेरी पट
१२) गुन्हे प्रणाली रजिष्टर (दरोडा,जबरीचोरी,घरफोडी)
१३) मोटर वाहन चोरी रजिष्टर
१४) निगराणी बदमाश रजिष्टर
१५) स्टाफ रजिष्टर
१६) कैदी रजा रजिष्टर
१७) एमओबी रजिष्टर (सर्च स्लीप रजिष्टर)
१८) टीसीएम रजिष्टर
१९) जेल रिलीज रजिष्टर
२०) पाहिजे फरार रजिष्टर
२१) एनडीपीए रजिष्टर
२२) इसी ॲक्ट रजिष्टर
२३) अनुसुचित जाती जमाती रजिष्टर
२४) ना.ह.सं. रजिष्टर
२५) अरेस्ट रजिष्टर
२६) अनओळखी मृतकांचे रजिष्टर

पोलीस अधीक्षक कार्यालयायात लोकांकडुन येणा–या निवेदनाचा निपटारा केल्या जाण्यासाठी अस्तिावात असलेल्या व्यवस्थेचा तपशिल

अर्ज चौकशी शाखा :–

अर्ज शाखेकडे विविध पोलीस ठाणे/शाखा अंतर्गत प्राप्त झालेले स्थानिक तक्रार अर्ज/शासनाकडील/उपमुख्यमंत्री यांचेकडील/मुख्यमंत्री यांचेक डील/पोलीस महासंचालक यांचे कडील तक्रार अर्ज अखत्यारी नुसार संबंधीत पोलीस ठाणे/शाखेस चौकशी कामी पाठविणे आणि उचित कार्यवाही अंती अहवाल प्राप्त करुन घेणे. तक्रारीचे निरसनानूसार अर्ज नस्तीबध्द करणे, वरिष्ठ कार्यालयास अहवाल सादर करणे, जिल्हा/विभागीय लोकशाही दिनातील प्राप्त अर्जावर तसेच जिल्हा/विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीतील अर्जावर अहवाल सादर करणे ही कामे येतात. या व्यतिरिक्त माहिती अधिकारी अधिनियम २००५ अंतर्गत प्राप्त अर्जावर/अपील अर्जावर मुदतीत कार्यवाही करुन अर्जदारास मुदतीत तपशील उपलब्ध करुन देणे ही कामे अर्ज चौकशी शाखे मार्फत करण्यांत येतात.

आस्थापना शाखा :– पोलीस कर्मचा–यांची आस्थापना विषयक सर्व कामे या शाखा मार्फत चालतात (पोलीस भरती, पदोन्नती, इत्यादीबाबत कामकाज चालते.)

विभागीय चौकशी शाखा :– पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे कसुरी प्रकरणे हाताळणे विभागीय चौकशी संबधी सर्व कामे हाताळणे.

पोलीस कल्याण :– पोलीस कल्याण शाखेकडे पोलीस कल्याण निधीमधून पोलीस अधिकारी/कर्मचा–यांना विविध अनुदान वाटप, महाराष्ट्र पोलीस कुंटूंब आरोग्य योजनेचे कामकाज व तत्संबंधी कामे करण्यात येतात. त्याचप्रमाणे पोलीस कल्याण निधी वृध्दीगंत करण्यासाठी विविध सांस्कृतीक कार्यक्रमोचे आयोजन करून निधी जमा करण्यात येतो. तसेच पोलीस बॅंड पथक विविध कार्यक्रमासाठी पुरविणे,त्यांचेसाठी लागणारे साहित्य खरेदी करणे,क्रिडा साहित्य खरेदी इत्यादी काम करण्यात येतात. अमरावती ग्रामीण जिल्हा अंतर्गत क्रिडा स्पर्धा/विभागीय स्पर्धा विषयक कामकाज.

मोटार परिवहन शाखा :– मोटार परिवहन लिपीका मार्फत मोटार परिवहन विभागाकडून प्राप्त झालेल्या देयकांना मंजुरी, देणे पोलीस वाहना बाबत सर्व पत्र, व्यवहार पाहणे, वस्त्र भांडार व शस्त्रागार विभागाशी संबधीत पत्र व्यवहार करणे इत्यादी कामे चालतात.

कलम ४(१) आठ प्रमाणे
पोलीस अधीक्षक कार्यालया तर्फे गठीत केलेले मंडळे व बैठकीचा तपशिल

पोलीस अधीक्षक कार्यालयात मासीक गुन्हे बैठक, विविध राष्ट्रीय/धार्मीक संणाच्या बदोबस्तासाठी घेण्यात येणा–या शांतता कमेटी बैठकी,अप्रिय घटना घडल्यास तात्काळ शातंता सम्तीच्या सदस्याची बैठक, महत्वाच्या व अतिमहत्वाच्या व्यक्तिच्या दौ–यानुसार बंदोबस्तासाठी बैठक आयोजित करून तसेच वर्तमान घडामोडीनुसार कायदा व सुव्यवस्था प्रश्न निर्माण होणारी सदृश्य परिस्थिती असल्यास तातडीच्या बैठकिचे आयोजन करण्यात येवून शातंता प्रस्थापित करणे,वाहतुक सप्ताहाचे आयोजसन विविध धर्मामधे जातीय सलोखा राखणेसाठी शातंता समितीची बैठक व मोहल्ला कमेटीच्या बैठकीचे आयोजन करणे. पति–पत्नितील अथवा कुंटुंबांतील कौटुंबिक समस्या सोडविण्यासाठी महिला तकार निवारण केद्रा मार्फत वेळोवेळी बैठकीचे आयोजन करण्यात येते. पोलीस कर्मचा–याची गा–हाणी सोडविण्यासाठी पोलीस कर्मचारी वृंदपरिषदेचे तिमाही आयोजन करून वेळप्रंसगी परिस्थितीनुसार पोलीस दरबार हि आयोजीत केला जातो.

या व्यतिरिक्त पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण येथे खालीलप्रमाणे सर्म त्या स्थापन असून समितीपुढे घेण्यात आलेल्या निर्णयाप्रमाणे कामकाज करण्यात येते.

सम्त्यांची माहिती सोबत जोडलेली आहे.

कलम ४(१) नऊ प्रमाणे

पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण येथील अधिकारी व मंत्रालयीन कर्मचारी तसेच पोलीस शिपाई ते सपोउपनि यांची निर्देशिका

अ. क्र.	अधिकारी पद	नांव	वर्ग	नोकरीवर रुजू झाल्याचा दिनांक	संपर्क नंबर
		पोलीस अधीक्षक			
१	पोलीस अधीक्षक	श्री. विशाल आनंद भा.पो.से.,	वर्ग – १	२२.११.२०२३	०७२१/ २६६४८००
		अपर पोलीस अधीक्षक			
२	अपर पोलीस अधीक्षक	श्री. पंकज कुमावत भा.पो.से.	वर्ग – १	०२.०२.२०२३	०७२१/ २६६२००७
		उपविभागीय पोलीस अधिकारी			
३	पोलीस उप अधीक्षक मुख्यालय	श्री. अर्जुन भगवान ठोसरे	वर्ग – १	प्र. पोलीस उप अधीक्षक मुख्यालय अमरावती ग्रा.	१३.०७.२०२३
३	उपविभागीय पोलीस अधिकारी	सुर्यकांत दत्तात्रय जगदाळे	वर्ग – १	उपविभागीय पोलीस अधिकारी अमरावती ग्रा.	१३.१२.२०२१
४	उपविभागीय पोलीस अधिकारी	श्री निलेश पांडे	वर्ग – १	उपविभागीय पोलीस अधिकारी मोर्शी	२८.९.२०२१
५	उपविभागीय पोलीस अधिकारी	श्री. एस.एस. भगत	वर्ग – १	उपविभागीय पोलीस अधिकारी अंजनगांव	२७.१०.२०२३
७	उपविभागीय पोलीस अधिकारी	श्री आशित नामदेव कांबळे	वर्ग – १	उपविभागीय पोलीस अधिकारी चांदुररेल्वे	२०.२.२०२४
८	उपविभागीय पोलीस अधिकारी	श्री. अतुलकुमार नवगीरे	वर्ग – १	उपविभागीय पोलीस अधिकारी अचलपूर	११.०३.२०२२
९	उपविभागीय पोलीस अधिकारी	श्री. एस.एस. भगत	वर्ग – १	प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी धारणी	२०.९.२०२१
१०	उपविभागीय पोलीस अधिकारी	श्री. गुरनाथ व्यंकटेश नायडु	वर्ग – १	उपविभागीय पोलीस अधिकारी दर्यापुर	१३.१२.२०२१

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण येथील पोलीसअधिकारी यांची निर्देशिका

पोलीस निरीक्षक

